## प्रेसनोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०८/०५/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| * | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) हर्षवर्धन वासुदेवराव इंगळे, वय ४२ वर्षे, पद – विषय साधन व्क्ती (कंत्राटी), ग टपं.स. भातकुली. रा. संतोशी माता कॉलनी VMV रोड, अमरावती<br>२) नरेन्द्र गोपाळकृष्ण धनस्कर वय 54 वर्ष पद प्रभारी केंद्र प्रमुख, कार्या. पं.स. भातकुली. रा. बापु कॉलनी, कवर नगर, अमरावती |
| ३ | अपराध घडला ता. व वेळ | ०७/०५/२०२६ चे १८/०० ते १९/३० वा.दरम्यान |
| ४ | घटनास्थळ | डॉ. देशमुख यांचे हॉस्पीटल चे बाजुला नेरोलॅक पेंट चे दुकाना समोर, रुख्मिनी नगर, अमरावती. |
| ५ | मागणी केली लाच रक्कम | ५०,०००/–रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ५०,०००/–रुपये<br>(२५,०००/ ओरिजनल नोटा आणि २५,०००/ खेळण्यातील अशा ५०,०००/ रुपये) |

**थोडक्यात हकिकत** :– तक्रारदार यांची मुलगी नामे कु वेदश्री पंकज मेटकर हीला इयत्ता पहील्या वर्गात अॅडमिशन पाहीजे असल्यकारणाने त्यांनी मुलीचे शिक्षणाचा अधिकार अंतर्गत तिचे दि. १९/०२/२०२६ रोजी ऑन लाईन पध्दतीने अर्ज दाखल केला होता. त्यानुसार लॉटरी पध्दतीने तक्रारदार यांचे मुलीला Tomoae Pri Eng School Kathora Bk (27070205604) ही शाळा मिळाली आहे. त्याबाबतचे ऑन लाईन तक्रारदार यांना मिळाले आहे.

तक्रारदार यांचे मुलीला शाळा मिळाल्यानंतर दि.३०/०४/२०२६ रोजी पत्ता पडताळणी करीता माझे ऑन लाईन अर्जातील पत्याप्रमाणे माझे राहते घरी पडताळणी करीता पंचायत समिती भातकुली जि.अमरावती येथुन श्री. हर्षवर्धन इंगळे आणि श्री.धनस्कर हे दोघे आले व त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुम्ही ऑन लाईन दिलेल्या पत्यावर राहता नाही. त्यामुळे तुमच्या मुलीला Tomoae Pri Eng School Kathora Bk (27070205604) या शाळेत अॅडमिशन मिळु शकत नाही. जर तुम्हाला अॅडमिशन पाहीजे असेल तर आम्ही तुमचा पडताळणी अहवाल सकारात्मक पाठवितो त्याकरीता तुला आम्हाला ५०,०००/– रुपये दयावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाज असल्या कारणाने हो म्हटले परंतु तक्रारदार यांना त्यांच्या निवासाच्या पत्याची पडताळणी करुन सकारात्मक अहवाल सादर करण्याकरीता ५०,०००/– लाचेची रक्कम दयायची नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालय अमरावती येथे तक्रार दिली.

सदर तक्रारी वरून आज दि. ०७/०५/२०२६ रोजी वरील नमुद आलेसे क्र १ व २ यांचे पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना त्यांच्या निवासाच्या पत्याची पडताळणी करुन सकारात्मक अहवाल सादर करण्याकरीता ५०,०००/– लाचेची रक्कम मागितली. तक्रारदार यांना ५०,०००/– रुपयाची मागनी करुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्याण २५,०००/ ओरिजनल नोटा आणि २५,०००/ खेळण्यातील अशा ५०,०००/ रुपयाची आलोसे क्र १ व २ हे सोबत येवुन इआलोसे क्र. २ हर्षवर्धन इंगळे यांनी पंचासमक्ष लाचरक्कम स्विकारली. वरुन आलोसे क्र १ व २ यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पो. स्टे. राजापेठ, अमरावती शहर येथे सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापू बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती., मा. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पो.नि. सुजाता बन्सोड, पो. अंमलदार प्रमोद रायपुरे, वैभव जायले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क :–१. श्री. बापू बांगर पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती परीक्षेत्र अमरावती **मो.न.** ९०११३२३४२६
२. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती मो.न. ९७६४२१०४८५
३. श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, घटकप्रमुख ला.प्र.वि.अमरावती मो.न.९८२३१११५५, ७५१७५७१०६४

कार्यालयीन पत्ता : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर– १०६४.

सुजाता गुलाबराव बन्सोड
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती